महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना / ११ /२०२३ दि. २५/०१/२०२३

## –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभाग, हददीत उपवन येथे **"संस्कृती आर्ट फेस्टीवल (उपवन)"** या कार्यक्रमाचे दि. २६/०१/२०२३ ते २९/०१/२०२३ पर्यत आयोजन करण्यात येणार आहे. येउर गेट कडुन पायलादेवी मंदिराकडे जाणा–या रस्त्याचे कडेला दोन्ही बाजुस २०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. कार्यक्रमाकरीता मोठया प्रमाणात नागरीक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सदर कार्यक्रमामुळे वाहतुक कोंडी होवु नये या करिता वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असुन सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चीत रहावी याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद** :– १) येऊर गेट कडुन उपवन पायलादेवी मंदिराकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना येऊर गेट **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– येऊर गेट कडुन उपवन तलावाकडे जाणारी वाहने ही शिवाईनगर देवदयानगर कट येथुन डावीकडे वळुन निळकंठ सोसायटी बिरसामुंडा चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– २) बिरसामुंडा चौकातुन पायलादेवी मंदिरकडुन येऊर गेट कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना पायलादेवी मंदिर येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– बिरसामुंडा चौकातुन पायलादेवी कडुन येऊर गेट कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही बिरसामुंडा चौकातुन निळकंठ सोसायटी देवदयानगर कट येथुन उजवीकडे वळुन शिवाईनगर येऊर गेट येथुन इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना हि दि. २६/०१/२०२३ ते दि. २९/०१/२०२३ रोजी पर्यत सकाळी ०७.०० ते रात्रौ २४.०० वाजे पावेता अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय,ठाणे
२/– सदरची अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– जिल्हाधिकारी, ठाणे
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–५, ठाणे.

CamScanner

– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका ,ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष,ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि वागळे, कापुरबावडी, राबोडी, नौपाडा, वाहतूक उपविभाग.

CamScanner